लोकमत

# नगरपरिषद उमरेड

## जाहीर सूचना

### "महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश २०१५"

### "अधिनियम अंतर्गत विविध लोकसेवा अधिसूचित सेवा देणेबाबत"

सर्व नागरिकांना, सामाजिक संस्था, शैक्षणिक संस्था, वाणिज्य संस्था तसेच सर्व राजकीय पक्ष, शासकीय व निमशासकीय कार्यालय तसेच केंद्रीय कार्यालय यांना याद्वारे सूचित करण्यात येते की, लोकसेवा हमी कायद्याअंतर्गत नगरविकास विभागाने विविध शासन निर्णयाद्वारे एकूण ६६ सेवांची यादी प्रसिद्ध केलेली आहे. तसेच वेळोवेळी नवीन लोकसेवा यादी प्रसिद्ध करून नगरप्रशासन विभागाला दिली जाते. त्यानुसार सर्व पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समयोचित सेवा देण्याकरिता महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश-२०१५ कलम ३ नुसार विहित नमुन्यात अर्ज आवश्यक कागदपत्रांसह सादर केल्यास नगरपरिषद उमरेडकडून आवश्यक लोकसेवा विहित मुदतीत दिली जाते. याकरिता नगरपंचायततर्फे पदनिर्देशित अधिकारी, प्रथम अपिलीय व द्वितीय अपिलीय अधिकारी यांना पदनिर्देशित करण्यात आलेले आहे. तरी नगरविकास विभागाने विविध शासन निर्णयाद्वारे विहित केलेल्या सेवांची यादी https://mahaulb.in/PortalSite/#/app/home या पोर्टलवर व उमरेड नगरपरिषद नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

स्वा/-

**(अर्चना मेंढे)**
मुख्याधिकारी
नगरपरिषद उमरेड

Nagpur Main
Page No. 4 Feb 05, 2025
Powered by: erelego.com